सातारा, सोमवार, ३ ऑक्टोबर २०१६ । किंमत ₹ ४

सकाळ

सकाळ
सातारा, सोमवार,
३ ऑक्टोबर २०१६
३

डी. पी. भोसले कॉलेज
ग्रंथालय
कोरेगाव

# भोसले कॉलेजला दहा लाखांची मदत

## डॉ. पतंगराव कदम यांची घोषणा; जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे उद्घाटन

**कोरेगाव, ता. २ :** पारंपरिक शिक्षणाबरोबरच कला व क्रीडा या क्षेत्रालाही व्यक्तिमत्त्व विकासामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांनी भौतिक सुविधांचे रडगाणे न गाता सकारात्मक दृष्टिकोनाद्वारे स्वतःला विकसित केले पाहिजे, असे मत रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य, आमदार डॉ. पतंगराव कदम यांनी येथे व्यक्त केले. डी. पी. भोसले महाविद्यालयासाठी दहा लाखांची मदतही त्यांनी यावेळी जाहीर केली.

येथील डी. पी. भोसले महाविद्यालयामध्ये जिल्हास्तरीय युवा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील होते. याप्रसंगी विद्यापीठ विकास मंडळाचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, स्थानिक व्यवस्थापन समितीचे सदस्य ज्ञानदेव भोसले, प्राचार्य डॉ. ताम्हणकर, डॉ. आर. व्ही. गुरव उपस्थित होते. डॉ. कदम म्हणाले, ''युवा महोत्सव हे खेळाडू, कलाकार तयार होण्याचे व्यासपीठ असल्याने अधिकाधिक विद्यार्थ्यांनी अशा महोत्सवात सहभागी झाले पाहिजे.''



**कोरेगाव : युवा महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. पतंगराव कदम. व्यासपीठावर डॉ. डी. आर. मोरे, डॉ. अनिल पाटील आदी.**
**(शेखर रसाळ : सकाळ छायाचित्रसेवा)**

'रयत'ला लवकरच शंभर वर्षे पूर्ण होत असल्याने या संस्थेची वाटचाल स्वतंत्र विद्यापीठाकडे सुरू असल्याचे व विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन संस्थेने रयत गुरुकुल क्रीडा ॲकॅडमी व रयत मास मीडियाची सुरवात केल्याचे डॉ. पाटील यांनी सांगितले.

विद्यापीठाने देशाच्या गुणवत्ता यादीमध्ये महत्त्वाचे स्थान पटकावल्याचे डॉ. मोरे यांनी नमूद केले. प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी प्रास्ताविक आणि डॉ. विद्या नावडकर, प्रा. पद्मिनी मोकाशी, प्रा. संगीता वीरकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डी. बी. पवार यांनी आभार मानले.